॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव, (प्रतिनीधी) दि. ५ ऑक्टोबर : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठांतर्गत असलेल्या बौध्दीक संपदा हक्क विभाग (आयपीआर सेल) व रासायनिक शास्त्र प्रशाळेच्या संयुक्त विद्यमाने 'कॉपीराईट फॉर अॅकेडमिया-२०२६' याविषयावर एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात करण्यात आले.

या कार्यशाळेच्या उद्‌घाटन भारत सरकारच्या स्वामित्वहक्क कार्यालयाचे निबंधक तथा विद्यापीठाचे माजी विद्यार्थी डॉ. दिनेश पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी मंचावर अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी, के.बी.आय.पी. सर्व्हीसेस प्रा. लि., पुणे येथील डॉ. खुशबू भुरट, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, आयपीआर चेअर प्रोफेसर डॉ. डी.जी. हुंडीवाले, प्रशाळा संचालक प्रा. दीपक दलाल, समन्वयक प्रा. विकास गीते उपस्थित होते.

या चर्चासत्रात उद्‌घाटकीय भाषण करतांना डॉ. दिनेश पाटील यांनी सांगितले की, बौध्दीक संपदा हा निर्मात्याचा अधिकार आहे. एखाद्याने निर्माण केलेल्या साहित्याचा वापर करतांना जबाबदारीपूर्वक व जाणीवपूर्वक संबंधितास श्रेय देवून बौध्दीक संपदा अधिकार कायद्याच्या तरतूदी विचारात घेवून करण्यात यावा. कॉपीराईटचा वापर मुक्तपणे करता येणार नाही. सर्जनशीलता, नवीन कल्पना व ज्ञाननिर्मितीस प्रोत्साहन देण्याचे कार्य भारत सरकारच्या स्वामित्वहक्क कार्यालयाद्वारे करण्यात येते. अध्यक्षीय समारोप करतांना कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांनी सांगितले की, जगाच्या तुलनेत पेटंट नोंदणी करण्यामध्ये भारताचे स्थान वरच्या क्रमांकावर नेण्याकरीता अधिकाधिक पेटंट नोंदणी होणे आवश्यक आहे. जगामध्ये देशाचे स्थान त्या देशाकडून किती पेटंट निर्माण झाले यावर ठरते. विद्यापीठाने स्थापन केलेल्या बौध्दीक संपदा कक्षाकडून गेल्यावर्षाभरात २२ पेटंट नोंदणी झाले आहेत. विद्यापीठ परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी या कक्षाच्या सुविधांचा फायदा घ्यावा असे आवाहन केले. डॉ. दिनेश पाटील हे या विद्यापीठाचे माजी विद्यार्थी आहेत. त्यांनी योग्य मेहनत, चिकाटी व सात्यतता ठेवून उंचीच्या पदावर आजे ते विराजमान आहेत. विद्यार्थ्यांनी नेहमी परिश्रम व सात्यतता ठेवून उज्ज्वल भविष्य घडवावे असेही सांगितले.

या चर्चासत्रात के.बी.आय.पी. सर्व्हीसेस प्रा. लि., पुणे व विद्यापीठाच्या बौध्दीक संपदा कक्ष यांच्या सामंजस्य करार करण्यात आला. या करारावर डॉ. खुशबू भुरट व विद्यापीठातर्फे कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी स्वाक्षरी केल्या. या करारामुळे विद्यापीठातर्फे पेटंट बाबतीत नोंदणी करण्याकरीता सहकार्य केले जाणार आहेत.

कार्यक्रमाच्या उद्‌घाटन सत्रानंतर मुख्य व्याख्यानात भारत सरकारच्या स्वामित्वहक्क कार्यालयाचे निबंधक डॉ. दिनेश पाटील यांनी बौद्धिक संपदा हक्कांचे महत्त्व आणि त्यासंदर्भातील विविध बाबींवर मार्गदर्शन केले.

डॉ. खुशबू भुराट यांनी 'कॉपीराइटची मूलभूत माहिती व बौद्धिक संपदा हक्क' या विषयावर मार्गदर्शन करताना कॉपीराइटची संकल्पना, त्याचे महत्त्व आणि बौद्धिक संपदा हक्कांमधील त्याचे स्थान स्पष्ट केले.

राष्ट्रीय बौद्धिक संपदा व्यवस्थापन संस्थेचे, नागपूर येथील सहाय्यक नियंत्रक कुमार राजू यांनी 'कॉपीराइट अर्ज दाखल करण्याचे प्रात्यक्षिक' या विषयातून कॉपीराइट नोंदणी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया प्रात्यक्षिकासह समजावून सांगितली.

यानंतर अनोव्हआयपी प्रा. लि., नवी दिल्लीच्या रती रस्तोगी यांनी 'कृत्रिम बुद्धिमत्ता आणि कॉपीराइट : डिजिटल युगातील आव्हाने व भविष्य' या विषयावर मार्गदर्शन केले. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या वापरामुळे कॉपीराइट क्षेत्रासमोर निर्माण होणारी आव्हाने तसेच डिजिटल युगातील भविष्यातील बदलांवर त्यांनी प्रकाश टाकला. अॅड. विकास आवळे यांनी 'कॉपीराइटची अंमलबजावणी व उल्लंघनासंदर्भातील प्रकरणांचा अभ्यास' या विषयावर मार्गदर्शन करताना कॉपीराइट उल्लंघन आणि त्याची कायदेशीर अंमलबजावणी यासंदर्भातील विविध प्रकरणांचा आढावा घेतला.

तसेच साजिद अख्तर यांनी 'कॉपीराइट क्षेत्रातील करिअरच्या संधी' या विषयावर मार्गदर्शन करताना या क्षेत्रातील विविध रोजगार व व्यवसायाच्या संधींची माहिती दिली. या चर्चासत्रात एकूण २२५ प्राध्यापक व विद्यार्थी सहभागी झाले. यावेळी रसायनशास्त्र प्रशाळेतील शिक्षक, चर्चासत्राचे सचिव डॉ. सारंग बारी, मयुर पाटील व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

.............................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ५ ऑक्टोबर, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

**जनसंपर्क अधिकारी करीता**

जनसंपर्क विभाग

जळगाव, (प्रतिनीधी) दि. ५ ऑक्टोबर : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील विचारधारा प्रशाळेअंतर्गत महात्मा गांधी अध्ययन व संशोधन केंद्रातर्फे गांधी सप्ताह २०२६ निमित्त रूशिल मल्टीपर्पज फाऊंडेशन आणि अपंग सेवा मंडळ संचलित मूक-बधिर विद्यालय, जळगाव येथील मूक-बधिर विद्यार्थ्यांसाठी विशेष चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. महात्मा गांधी यांच्या विचारांचा आणि कार्याचा विद्यार्थ्यांमध्ये परिचय व्हावा, तसेच त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या समावेशक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या चित्रकला स्पर्धेत एकूण ७५ मूक-बधिर विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. 'स्वच्छ भारत आणि गांधीजी', 'गांधीजींच्या चष्म्यातून भारत' आणि 'मोहनदास ते महात्मा' या विषयांवर विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून आणि कलात्मक अभिव्यक्तीतून चित्रे साकारली. आपल्या चित्रांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी महात्मा गांधी यांच्या विचारांना आणि कार्याला आदरांजली वाहिली. विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांना कलात्मक अभिव्यक्तीचे व्यासपीठ उपलब्ध करून देणारा हा उपक्रम सामाजिक समावेशकता आणि समान संधीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरला.

या प्रसंगी महात्मा गांधी अध्ययन व संशोधन केंद्राचे विभागप्रमुख डॉ. उमेश गोगडीया तसेच दोन्ही विद्यालयांचे मुख्याध्यापक उपस्थित होते. स्पर्धेचे परीक्षक म्हणून शिवम हुजूरबजार आणि निशात अब्दुल रज्जाक यांनी काम पाहिले. स्पर्धेचे समन्वयक म्हणून प्रा. मोईन शेख यांनी जबाबदारी पार पाडली, तर सूत्रसंचालन प्रा. योगेश माळी यांनी केले.

.......................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ५ ऑक्टोबर, २०२६

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

**जनसंपर्क अधिकारी करीता**